पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- ०३/०३/२०२०

## महिला- विद्यार्थीनींनी जाळले नक्षल बॅनर

- **नक्षलवाद्यांनी भूलथापा देवुन महिलांवरील अन्याय, अत्याचार थांबविण्याची भावना केली व्यक्त.**

उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या पोमके ताडगाव हद्दीतील मौजा ताडगाव ते मौजा आलापल्ली रोडवरील Y पाईंट नजिक समाजामध्ये दहशत पसरविण्यासाठी नक्षलवाद्यांनी बॅनर व डमी भूसुरूंग लावला होता. परंतु नक्षलवाद्यांचे मनसुबे ताडगाव येथील महिला व विद्यार्थीनींनी उधळवुन लावत,  नक्षल बॅनर काढुन त्यांची होळी केली.

नक्षलवाद्यांनी ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिला दिन साजरा करण्यासाठी दहशत पसरविणारा मजकुर व डमी भूसुरूंग लावुन परिसरात दहशत पसरविण्याचा नक्षलवाद्यांचा मानस होता. परंतु ताडगाव पंचक्रोशीतील महिला व विद्यांर्थीनींनीच नक्षलवाद्यांचे आवाहन झुगारून लावत. नक्षलींचे बॅनर जाळत नक्षलींना चांगलीच चपराक लगावली आहे.

नक्षलवादी आदिवासी बांधवांच्या डोळ्यांत नेहमीच धुळफेक करून दुटप्पी भूमिका घेत असल्याचे यावेळी महिलांनी बोलुन दाखविले. त्याचबरोबर एकीकडे नक्षलवादी इरपनार ता. भामरागड येथे राहणाऱ्या बेबी मडावी हिचा निघृण खून करतात व दुसरीकडे महिला दिन साजरा करण्याच्या नावाखाली परिसरात दहशत पसरविण्याचा प्रयत्न करतात. हे खपवुन घेतले जाणार नाही. नक्षलवादी अल्पवयीन मुलींचा त्यांचा देशविघातक कृत्यांसाठी करत असलेला वापर थांबवावा. बेबी मडावी जिंदाबाद, नक्षलवादी मुर्दाबादचा जयघोष करत उपस्थित महिलांनी तीव्र शब्दांत नक्षलवादयांचा निषेध व्यक्त केला. त्याचबरोबर नक्षलवादयांच्या कोणत्याही धमकीला आम्ही बळी पडणार नसल्याचे महिलांनी ठणकावुन सांगीतले.

आजपर्यंत गडचिरोली जिल्ह्यातील २२ निरपराध महिलांचे खून नक्षलवाद्यांनी केले आहे. मौजा ताडगाव पंचक्रोशीतील महिलांनी व विद्यार्थीनींनी दाखविलेल्या धाडसाचे मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी कौतुक केले आहे.



